# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० / फाल्गुन ६, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** | |
| **(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(४) ग्रामविकास मंत्री** | |
| **(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्ये मंत्री** | |
| **(६) महिला व बालविकास मंत्री** | |
| **(७) मृद व जलसंधारण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७२**

---

### रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हयासह गावठाण क्षेत्रातील घरबांधणी परवानगीचे अधिकार ग्रामपंचायतीकडे देण्याबाबत

**(१) * ७६५ श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ४८७६१ ला दिनांक २४ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हयासह गावठाण क्षेत्रातील घरबांधणी परवानगीचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीकडे देण्याबाबत घेतलेल्या महत्वाच्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होण्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त जिल्हयांमध्ये गावठाण क्षेत्रातील घरबांधणी परवानगीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत व सदर निर्णयाची अंमलबजावणी कधीपर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गावठाण क्षेत्रातील घरबांधणी परवानगीची कोणतीही प्रकरणे ग्रामपंचायतीकडे प्रलंबित नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलयुक्त शिवार योजनेबाबत

**(२) * ८५९ श्री.जयंत पाटील, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास कदम, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक, श्री.विनायकराव मेटे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.अरुणभाऊ अडसड : दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ४८०५७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या काही भागात निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर व दुष्काळावर मात करण्यासाठी तत्कालीन शासनाची सन २०१४-१५ मध्ये महत्त्वाकांक्षी योजना म्हणुन ओळखली गेलेल्या जलयुक्त शिवार योजनेची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपल्याने त्यास मुदतवाढ न देता जलयुक्त शिवार योजना बंद करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ या वर्षापासून राज्यातील ग्रामीण भागातील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी जलयुक्त शिवार प्रकल्पांतर्गत सुमारे २२ हजार ५८६ गावे निवडलेली असून त्यावर सुमारे रुपये ९ हजार ५८९ कोटी

एवढा निधी सन २०१९ पर्यंत खर्च झाला असून जलसंधारणाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असल्याने जलयुक्त शिवार योजनेतील त्रुटीचा अभ्यास करण्यासाठी माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीने माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केलेल्या अहवालात सदर योजनेत अनेक त्रुटी असल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१८ मध्ये राज्यात ३५३ तालुक्यांपैकी सुमारे २९४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून ८० टक्के महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेचे नाव बदलून योजनेची कामे ही रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जलयुक्त शिवार योजना बंद करण्याच्या निर्णयामुळे ग्रामीण व डोंगराळ भागात निर्माण होणाऱ्या पाण्याच्या गंभीर समस्येबाबत सदर योजनेव्यतिरिक्त इतर कोणती योजना राबविणे शासनाच्या विचाराधीन आहे काय, योजनेचे स्वरुप काय आहे तसेच जलयुक्त शिवार योजना बंद करण्यात आली नसल्यास सदर योजना अधिक सक्षमपणे राबविण्याबाबत आणि महाराष्ट्र राज्य पाणीटंचाई मुक्त करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) जलयुक्त शिवार अभियानाचे सन २०१८-१९ हे शेवटचे वर्ष होते. सदर अभियानास ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यामुळे योजना बंद करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५ ते सन २०१९ या कालावधीत एकूण २२५८६ गावे निवडण्यात आली असून या गावात एकूण ६,३२,७०८ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सदर कामांवर आतापर्यंत रुपये ९७०७ कोटी खर्च झाला आहे.

जलयुक्त शिवार अभियानाबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने माजी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या तज्ञ समितीने शासनास दिनांक १२/६/२०१८ रोजी अहवाल सादर केला असून समितीने जलयुक्त शिवार योजनेच्या संदर्भात काही शिफारशी केलेल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने तज्ञ समितीने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबत शासनास निर्देश दिले होते. त्यास अनुसरून शासनाने सदर शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीबाबत मा.उच्च न्यायालयात दिनांक १७/६/२०१९ रोजी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

(३) सन २०१८ च्या खरीप हंगामात राज्यातील १५१ तालुक्यामध्ये गंभीर/मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला. तद्नंतर ज्या महसूल मंडळामध्ये जून ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत तालुक्याच्या सरासरी पर्जन्याच्या ७५ टक्के पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मी. पेक्षा कमी झाले आहे, अशा एकूण ९३ तालुक्यातील २६८ महसूली मंडळामध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुके व २६८ महसुली मंडळाव्यतिरीक्त जून ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत झालेले एकूण पर्जन्यमान ७५० मि.मी. पेक्षा असलेल्या महसूल मंडळातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या एकूण ५४४९ गावांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी विभागाच्या नियमित योजनांमधून मृद व जलसंधारणाची उपचार कामे घेण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील कामगार रुग्णालयामध्ये सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३) * ३११ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७४९७ ला दिनांक २५ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अंधेरी एम.आय.डी.सी. भागातील राज्य विमा निगम महामंडळाच्या (ईएसआयसी) कामगार रुग्णालयाला दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीला एक वर्षाचा कालावधी उलटूनही रुग्णालय पूर्ववत सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असून काही विभाग बंद असल्याने जोगेश्वरी-अंधेरीतील रुग्णांना अन्य खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालय सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामगार रुग्णालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी राज्य कामगार विमा रुग्णालय, कांदिवली यामार्फत उपचार पुरविण्यात येत आहेत. तसेच, अतिविशिष्ट सेवा या राज्य कामगार विमा महामंडळाने टाय-अप केलेल्या खाजगी रुग्णालयांमार्फत देण्यात येत आहेत. खाजगी रुग्णालयात उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय केली जाते.

(३) व (४) अंधेरी (ई.एस.आय.सी.) रुग्णालय हे राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत असून राज्य शासनाचे त्यावर प्रत्यक्ष नियंत्रण नाही. याबाबत अप्पर आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय, राज्य कामगार विमा महामंडळ, मुंबई यांचेकडून दिनांक ०६/०२/२०२० रोजी प्राप्त पत्रानुसार राज्य कामगार विमा आदर्श रुग्णालय, अंधेरीच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम एन.बी.सी.सी. इंडिया यांना देण्यात आलेले असून सदर रुग्णालयाच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम जून, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया या सहा जिल्ह्यातील शासकीय रूग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) * ४६७ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया या सहा जिल्ह्यातील शासकीय रूग्णालयातील फिजिशियन ११ पदे, बालरोग तज्ञ ४० पदे, जनरल सर्जन ६ पदे, स्त्री रोग व प्रसूती तज्ञ ५० पदे, बधिरीकरण ५६ पदे, अस्थिरोग तज्ञ ४ पदे, नेत्ररोग तज्ञ ४ पदे व इतर तज्ञ व टेक्नेशियन असे एकूण २२२ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे तसेच राज्यात तज्ञ डॉक्टरांच्या १७०० पदांपैकी ११५२ पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्धवेळ डॉक्टरांवर शासनाने रिक्त पदांची जबाबदारी टाकली असून २४ तास सुरु राहणाऱ्या रुग्णालयात केवळ ३ ते ४ तास डॉक्टरांची सेवा मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागास वेळोवेळी निवेदने दिली असून याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर येथील कामगार विमा रुग्णालयाची विशेषज्ञांची ११ पदे व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची १८३ पदे रिक्त असून, कामगार विमा रूग्णालयाचा विकास करण्यासाठी राज्य कामगार विमा महामंडळ रद्द करून त्याऐवजी महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन करण्यात आली होती, परंतु रिक्त पदांमुळे व आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना सुविधा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने नागपूर येथील कामगार विमा रुग्णालयाची विशेषज्ञांची ११ रिक्त पदे व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची १८३ रिक्त पदे आणि विदर्भातील उक्त

जिल्ह्यामधील रुग्णालयातील रिक्त पदे व राज्यातील तज्ञ डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर परिमंडळांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२३ : ६७७००-२०८७०० व एस-२० : ५६१००-१७७५००) मधील विशेषज्ञ संवर्गातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे. :-

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| फिजिशियन | ३६ | १८ | १८ |
| बालरोगतज्ञ | ११५ | ६४ | ५१ |
| जनरल सर्जन | ३५ | २३ | १२ |
| स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ | १२० | ६० | ६० |
| बधिरीकरण तज्ञ | ११९ | ५१ | ६८ |
| अस्थिरोग तज्ञ | २९ | २६ | ०३ |
| नेत्ररोग तज्ञ | ३१ | २२ | ०९ |
| एकूण | ४८५ | २६४ | २२१ |

तथापि, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी व आयपीएचएस अंतर्गत विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तात्पुरत्या स्वरुपात तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी व आयपीएचएस अंतर्गत विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तात्पुरत्या स्वरुपात तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच

वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत व रुग्णसेवा सुरळीत ठेवण्यासाठी एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांना एक वर्षाच्या कालावधीसाठी बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावर नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-२३ : ६७७००-२०८७००) मधील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० : ५६१००-१७७५००) मधील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येत आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा योजना, नागपूर येथे विशेषज्ञांची एकूण १३ पदे मंजूर असून त्यापैकी ५ पदे भरलेली आहेत. तसेच रिक्त पदावर विशेषज्ञांच्या सेवा राज्य कामगार विमा महामंडळ व राज्य कामगार विमा योजनेंतर्गत पदव्युत्तर बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची १६५ पदे मंजूर असून ५६ पदे भरलेली आहेत.

सद्य:स्थितीत राज्य कामगार विमा महामंडळामार्फत ५ अंशकालीन विशेषज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच बंधपत्रित ८ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी ३ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा रुग्णसेवेसाठी वापरण्यात येत आहे. तसेच नागपूर रुग्णालयात एक्स-रे, ई.सी.जी. या सुविधा उपलब्ध असून, इतर उपचाराकरीता राज्य कामगार विमा मंहामंडळाने टाय-अप केलेल्या खाजगी रुग्णालयामार्फत विमा रुग्णांना वैद्यकीय उपचार पुरविण्यात येतात. त्यानुसार रुग्णांना रुग्णालयीन सुविधा पुरविण्यात येते.

(५) शासनाकडून नियमित पदे भरली जाईपर्यंत कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याबाबत व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सेवा करार तत्वावर GEM PORTAL वरुन घेण्याचा निर्णय दिनांक ०७/०२/२०२० रोजीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार वैद्यकीय अधीक्षक, रुग्णालय, नागपूर यांचेस्तरावरुन पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच राज्यातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जलसंपदा विभागाकडून इतिवृत्तास मान्यता मिळणेपूर्वी प्रकल्पांना मान्यता दिल्याबाबत

**(५) * २४६ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत शासनाच्या काळात जलसंपदा विभागामार्फत मंत्रिमंडळ बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता मिळण्यापूर्वीच व व्यय अग्र समितीची (ईपीसी) मान्यता न घेताच नियमबाहय पध्दतीने सुमारे ६१४६ कोटी रुपये खर्चाच्या सिंचन प्रकल्पांना मान्यता दिली असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

दिनांक ०९/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतच्या प्रस्तावास काही अटींच्या अधीन राहून मा.मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त अंतिम होण्याची वाट न पाहता विभागाने शासन निर्णय निर्गमित करावा, असे निर्देश मा.मंत्रिमंडळाने दिले होते. सदरहू निर्देशास अनुसरुन विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत.

प्रस्तुत प्रकल्पाच्या धारिका या विहित कार्यपध्दतीनुसार नियोजन विभाग व वित्त विभागामार्फत व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आल्या. व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आले होते. सदरहू सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतचे प्रस्ताव खालीलप्रमाणे :-

i. भातसा पाटबंधारे प्रकल्प, ता.शहापूर, जि.ठाणे (सहावी सुधारित प्रशासकीय मान्यता)
ii. वाघूर प्रकल्प, ता.जि.जळगांव (सातवी सुधारित प्रशासकीय मान्यता)
iii. उर्ध्व तापी टप्पा-१ हतनुर प्रकल्प, जळगांव (चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता)
iv. वरणगांव तळवेल परिसर सिंचन योजना (प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता)
v. शेळगाव बॅरेज मध्यम प्रकल्प, तालुका व जिल्हा जळगांव (व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता)

(२) दिनांक ०४/१२/२०१९ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये वरील प्रस्तावांबाबत मंत्रिमंडळात चर्चा करण्यात आली आणि उपरोक्त प्रस्तावांचे विभागाने सादरीकरण करावे व त्यानंतर पुढील कार्यवाही करावी, असा निर्णय घेण्यात आला. त्यानुषंगाने मा.मंत्री, जलसंपदा यांचेसमोर त्यांचे दालनात दिनांक ११/१२/२०१९ रोजी सदरहू प्रस्तावांचे सादरीकरण करण्यात आले आहे व याबाबतची वस्तुस्थिती मा.मुख्यमंत्री महोदयांना माहितीस्तव तथा आदेशार्थ सादर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य पुराभिलेख संचालनालयातील कर्मचाऱ्यांना सहाय्यक संचालक पदावर पदोन्नती देण्याबाबत

**(६) * ७४७ डॉ.परिणय फुके : दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ४२६४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुराभिलेख संचालनालयातील सहाय्यक संचालक गट-ब (राजपत्रित) व उपसंचालक गट-अ (राजपत्रित) या पदांच्या सेवा प्रवेश नियमास मा.राज्यपाल महोदयांची २०१२-२०१३ मध्ये मंजूरी मिळूनही सदरहू पदांचे सेवा प्रवेश नियम पाच वर्षाचा कालावधी होऊनही पारित करण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालनालयातील मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर व कोल्हापूर या विभागीय कार्यालयातील सर्व सहाय्यक संचालकांची पदे सन २०१२ पुर्वीपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाय्यक संचालक पदावर पदोन्नतीस संचालनालयातील कर्मचारी पात्र असतानाही केवळ सेवा प्रवेश नियम पारित नसल्याने गेली ५ वर्षापासून पदोन्नतीपासून वंचित रहावे लागले असून संघटना/कर्मचारी वर्ग यांनी सेवा प्रवेश नियम पारित करावे म्हणून पाच वर्ष वारंवार निवेदनेही दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सेवा प्रवेश नियम अंतिम न करता बाहेरील विभागातील कर्मचाऱ्यांना सहाय्यक संचालक पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती तसेच अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सेवा प्रवेश नियम अंतिम होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुराभिलेख संचालनालयातील कर्मचाऱ्यांना सहाय्यक संचालक पदावर पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

मुंबई पुरालेखागारात २ तसेच औरंगाबाद, कोल्हापूर व नागपूर पुरालेखागारात प्रत्येकी एका सेवाजेष्ठ कर्मचाऱ्यास सहाय्यक संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. मुंबई व पुणे विभागाच्या सहाय्यक संचालक या पदासाठी प्रतिनियुक्तीने अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) अंशतः खरे आहे.

पुराभिलेख संचालनालयातील कर्मचारी वृंदाचे सेवा प्रवेश नियम नव्याने तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) मुंबई पुरालेखागारात २ तसेच औरंगाबाद, कोल्हापूर व नागपूर पुरालेखागारात प्रत्येकी एका सेवाजेष्ठ कर्मचाऱ्यास सहाय्यक संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. मुंबई व पुणे विभागाच्या सहाय्यक संचालक या पदासाठी प्रतिनियुक्तीने अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) सामान्य प्रशासन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने तुलनात्मक बाबी पडताळून पाहण्यासाठी इतर राज्यातील सहाय्यक संचालकांचे सेवाप्रवेश नियम पुराभिलेख संचालनालयाकडून मागविण्यात आले आहेत.

(६) संबंधित पदांचे सेवा प्रवेश नियम तयार झाल्यानंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## अखिल भारतीय आराधी महासंघाच्या विविध मागण्यांबाबत

**(७) * १२७० श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.अनिल भोसले** : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय आराधी महासंघाच्यावतीने मुंबई येथील आझाद मैदान येथे आराधी, वाघ्या, मुरळी, पोतराज, जोगीणी, सनईवाले, घडशी, वासुदेव, पिंगळे आणि गोंधळी या समाजाच्या जनतेने दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास धरणे-आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अखिल भारतीय आराधी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी उक्त समाजाच्या लोकांना लोककलाकार म्हणून मानधन, किमान रुपये १५००/- पेन्शन तसेच घरकुल योजनेचा लाभ व विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा, शासकीय दफ्तरी नोंद व्हावी यासह अन्य विविध मागण्यांबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त समाजाच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर निवेदनातील मासिक मानधनाची मागणी ही सांस्कृतिक कार्य विभागाशी संबंधित आहे. या विभागाचा शासन निर्णय, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलाकार यांच्या मानधनात दिडपट वाढ करण्यात आली आहे. इतर मागण्याबाबत सदर निवेदनाची प्रत संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये तज्ञ डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) * ८३८ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याने उपचारासाठी आलेल्या रुग्णांना औषधोपचारापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दापोली उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय संवर्गातील एकूण ४६ मंजूर पदांपैकी १२ पदे रिक्त असून माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक तसेच स्त्री रोगतज्ञ यांची बदली करण्यात येवून तेथे कंत्राटी पध्दतीने असलेल्या वर्ग-२ च्या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची मुदत संपुष्टात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांना जीवनावश्यक औषधे उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपजिल्हा रुग्णालयातील सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच औषधांचा पुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

वैद्यकीय अधीक्षक आणि एक वैद्यकीय अधिकारी यांचेवर रुग्णसेवेसंबंधी हलगर्जीपणाचा आरोप असल्यामुळे त्यांची सेवा उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, कोल्हापूर यांच्यास्तरावरुन तात्पुरत्या स्वरुपात अन्य आरोग्य संस्थेत वर्ग करण्यात आली आहे.

मुदत संपलेल्या एक कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना नियमानुसार सेवेत खंड देण्यात येऊन पुनश्च नियुक्ती देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) रुग्णालयात जीवनावश्यक औषधांचा पुरवठा मुबलक प्रमाणात असून तेथील नियमित व कंत्राटी वैद्यकीय अधिकारी हे उपलब्ध साधनसामुग्री यांचा आवश्यकतेनुसार वापर करुन जनतेला आरोग्य सुविधा देत आहेत.

सदर उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकाचा कार्यभार त्या संस्थेतील वैद्यकीय अधिकाऱ्यास देण्यात आलेला असून नियमित वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २६/०२/२०१६ व दिनांक २४/०६/२०१६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला अधिकार देण्यात आले आहेत. तसेच कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्यासाठी दिनांक ०२/०३/२०१५ व दिनांक २१/०४/२०१५ नुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीस अधिकार देण्यात आले आहेत. त्यामार्फत रिक्त पदे भरण्यात येतात.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागात व आदिवासी जिल्हयांत कुपोषण निर्मुलन करण्याबाबत

**(९) * ४७२ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व आदिवासी जिल्हयात कुपोषण निर्मुलनासाठी अनेक योजना राबवूनही कुपोषित बालकांची संख्या वाढत असून बालमृत्यू होत असल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील बालकांमधील कुपोषण निर्मुलन व बालमृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) माहे नोव्हेंबर, २०१९ च्या तुलनेत माहे डिसेंबर, २०१९ मध्ये सर्वसाधारण बालकांच्या संख्येत वाढ झालेली असून SAM व MAM बालकांच्या संख्येत घट झालेली आहे.

राज्यात माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये १,६२१ व डिसेंबर, २०१९ मध्ये १,४९९ एवढे बालमृत्यू झाले आहेत. तसेच माहे नोव्हेंबर, २०१९ च्या तुलनेत माहे डिसेंबर, २०१९ मध्ये बालमृत्यूची संख्या कमी झालेली आहे.

बालमृत्यूची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१. कमी वजनाची बालके,
२. तापसदृष्य आजार,
३. डायरिया,
४. डिसेंट्री,
५. न्युमोनिया,
६. ए.आर.डी.एस.,
७. हायपोथर्मिया,
८. कन्जेनीटल ॲनामोली,
९. कमी दिवसांची प्रसुती,
१०. ॲसपेक्शीया व इतर.

(२) कुपोषणा संदर्भात कॅस (CAS) अहवालानुसार SAM बालकांची पडताळणी करण्याचे काम सुरु आहे.

राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर स्त्रीया व स्तनदा मातांना THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा व ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.
२. आदिवासी प्रकल्पांमध्ये अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजनेंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येतात.

३. राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. यामध्ये लाभार्थ्यांना तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य विभागामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४. राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविधस्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दीदृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रियलटाईम मॉनिटरिंग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयासह राज्यात अतिवृष्टीमुळे शाळांच्या इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(१०) * ११५९ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह रायगड जिल्हयात माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच वादळामुळे जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या अनेक शाळांची पडझड होवून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेच्या व्हरांड्यात बसून शिक्षण घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध होण्याबाबत रायगड जिल्हा परिषदेकडून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने शाळा इमारत दुरूस्तीसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीसाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

(३) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचेकडून शाळा दुरुस्तीसाठी निधी वितरीत करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील आरोग्य संकुलाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(११) * ७६६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरात मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाची सर्व कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी ७ वर्षापुर्वी ३ मजली इमारत बांधकामासाठी निधी मंजूर झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारत पूर्ण बांधुन तयार झाल्यावर तिसऱ्या मजल्याची परवानगी असूनही ७ वर्षे उलटुनही तिसरा मजला बांधण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

औरंगाबाद येथील विभागीय आरोग्य संकुल इमारतीचे २ मजल्याचे काम पूर्ण झाले आहे. सदर इमारतीमध्ये आरोग्य विभागाची ८ कार्यालये कार्यान्वित आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) औरंगाबाद येथील विभागीय आरोग्य संकुल इमारतीच्या तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणे, बगीचा व सुशोभिकरण करणे या कामासाठी रुपये २६३.२६ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रक व आराखड्यास दिनांक ०२/११/२०११ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी सन २०१२-१३ मध्ये रुपये ७७.४७ लक्ष व सन २०१३-१४ मध्ये रुपये ३६.७० लक्ष असे एकूण रुपये ११४.१७ लक्ष मार्च, २०१४ पर्यंत खर्च करण्यात आले आहेत. उर्वरित निधी पूरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयाची नवीन इमारत बांधण्याबाबत

**(१२) * १९५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीसाठी रुपये ११ कोटी ८५ लाखांचा निधी माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्य रेल्वे व मुंबई-आग्रा महामार्गाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या खर्डी गावाला ६० पाडे व ३० गावे असून येथे मुंबईला पाणीपुरवठा करणारी मोडकसागर, तानसा व भातसा अशी ३ मोठी धरणे असल्याने येथे होणाऱ्या अपघातग्रस्त रुग्णांना तात्काळ औषधोपचार मिळावा या हेतूने शासनाने सन २०११ मध्ये खर्डी नाक्यावर ग्रामीण रुग्णालय सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा व तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने तसेच मंजूर २५ कर्मचाऱ्यांपैकी फक्त १३ कर्मचारी उपलब्ध असल्याने या रुग्णालयात रुग्णांवर प्रथमोपचार करून रुग्णालयाला स्वत:ची इमारत नसल्याचे कारण देत ठाणे किंवा शहापूर येथील रुग्णालयात

पाठविण्यात येत असून परिणामत: वेळीच उपचार न मिळाल्याने अनेक अपघातग्रस्त व सर्पदंश झालेल्यांना जीवही गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या उभारणीसाठी निधी उपलब्ध झालेला असतानाही इमारतीच्या कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामीण रुग्णालयाची इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) खर्डी ग्रामीण रुग्णालयास स्वतःची इमारत नसल्यामुळे २५ मंजूर पदांपैकी १५ पदे भरण्यास मंजूरी आहे. त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत.

तज्ञांकडून उपचार आवश्यक असलेल्या रुग्णांना टोल फ्री क्रमांक १०८ च्या रुग्णवाहिकेद्वारे आवश्यकतेनुसार शहापूर/ठाणे येथे संदर्भित केले जाते.

(४) ग्रामीण रुग्णालय इमारत बांधकामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मोबाईल रिचार्जसाठी निधी मिळण्याबाबत

**(१३) * १०७३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८४ हजार अंगणवाडी सेविकांना व मदतनीस यांना शासनाने पॅनासोनिक कंपनीचे मोबाईल दिले असून त्या मोबाईलच्या रिचार्जसाठी कोणतीही आर्थिक तरतूद केली नसल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या अभियानांतर्गत ठाण्यातील १,८५४ अंगणवाडीमधील ३,५०० सेविकांना स्मार्ट फोन देण्यात आले असून रिचार्जसाठी महिना रुपये ४००/- देण्याचे ठरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविकांना दोन महिन्यांपासून मानधनाअभावी उपासमारी सहन करावी लागत असताना केंद्र शासनाच्या पोषण आहार प्रकल्प चालविण्यासाठी उधारी घेऊन मोबाईल रिचार्ज करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मोबाईल रिचार्जसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यात ९ ग्रामीण/आदिवासी व ११ नागरी प्रकल्प कार्यरत असून त्याअंतर्गत ३६९५ अंगणवाडी/मिनी अंगणवाडी केंद्रातील सेविकांना ३६९५ मोबाईल फोनचे वाटप करण्यात आले आहे. तसेच १५० मोबाईल फोन मुख्यसेविकांना वाटप केले आहेत.

ठाणे जिल्ह्यात मोबाईल रिचार्ज करण्यासाठी प्रति महिना रुपये ४००/- दिले जात नसून ३ महिन्यांसाठी रुपये ४००/- याप्रमाणे अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यानुसार माहे मार्च, २०१९ ते नोव्हेंबर, २०१९ पर्यंत एकूण ३ तिमाहीसाठी (९ महिने) रुपये १२००/- एवढी रक्कम संबंधित सेविका, मुख्यसेविका यांचे खात्यावर जमा करण्यात आलेली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

मोबाईल रिचार्ज करणेसाठी माहे मार्च, २०१९ ते नोव्हेंबर, २०१९ पर्यंतची प्रति तिमाही रुपये ४००/- या प्रमाणे तीन तिमाहीसाठी रुपये १२००/- एवढी रक्कम संबंधित सेविका, मुख्यसेविका यांचे खात्यावर जमा करण्यात आलेली आहे. सदर मोबाईल फोनचे Configuration व प्रशिक्षण प्रत्यक्षात माहे एप्रिल व मे, २०१९ या दरम्यान झालेले असल्याने मोबाईल रिचार्जसाठी

उपलब्ध असलेली रक्कम काही जिल्हयांनी मे, २०१९ पासून वापरण्यास सुरुवात केलेली होती. यानुसार सदरची रक्कम माहे जानेवारी, २०२० पर्यंत वापर करण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक ११/२/२०२० रोजी पुढील १ वर्षासाठी प्रति अंगणवाडी सेविका व मुख्यसेविका यांना रुपये १६००/- प्रमाणे आगाऊ स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील नद्यांची पूररेषा निश्चित करण्याबाबत

**(१४) * ५३९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्हयात सन २००५ मध्ये आलेल्या महापूरानंतर जिल्हयातील नद्यांची पूररेषा निश्चित करण्याचे नियोजन करण्यात आले असले तरी गेल्या १४ वर्षांत एकाही नदीची पूर नियंत्रण रेषाच आखण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या पाटबंधारे विभागाकडून नद्यांच्या पूर नियंत्रण रेषांची आखणी करणे बंधनकारक असतानाही अशी नियंत्रण रेषा आखण्यास विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हयातील वसई व ठाणे जिल्हयातील बदलापूर, अंबरनाथ, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी आणि ठाणे स्थानिक स्वराज्य संस्थांनी काल्पनिक पूररेषा आखून त्याद्वारे बांधकाम परवानग्या देण्याचा प्रकार सुरू केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नद्यांच्या पूर नियंत्रण रेषा निश्चित करण्याबाबत ज्या विभागाने दिरंगाई केली अशा विभागावर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन काल्पनिक पूररेषा निश्चित करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी बांधकाम परवानग्या देऊन इमारतीचे बांधकाम केले आहे, त्या बांधकामांना अनधिकृत घोषित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्ह्यात ८ नद्या आहेत. त्यापैकी उल्हास नदीचे पूररेषा आखणीचे काम काही भागात (२५ कि.मी.) पूर्ण झाले आहे.

पालघर जिल्ह्यात ७ नद्या आहेत. त्यापैकी तानसा व वैतरणा नदीचे पूररेषा आखणीचे काम काही भागात (२१ कि.मी. व ३५.४० कि.मी.) पूर्ण झाले आहे.

(२) इतर उर्वरित नदयांचे पूरप्रवण भागाचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे व पूररेषा निश्चितीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) अशी वस्तुस्थिती निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न भाग क्र. ३ चे उत्तर पाहता प्रश्न भाग क्र. ४ मधील काल्पनिक पूर रेषा निश्चित करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी बांधकाम परवानग्या देऊन इमारतीचे बांधकाम केले आहे, त्या बांधकामांना अनधिकृत घोषित करण्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय मंडळ स्थापन करण्याबाबत

**(१५) * ३३७ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या अनेक भागात वैद्यकीय मंडळ (मेडिकल बोर्ड) अस्तित्वात नसल्याने एखाद्या गर्भवतीच्या जिवाला धोका नसलेल्या २० आठवड्यापुढील गर्भधारणेच्या प्रकरणात मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर त्या गर्भवतीच्या वैद्यकीय स्थितीविषयी वैद्यकीय मंडळाकडून अहवाल मिळण्यास उशीर होत असल्याने प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात कायमस्वरूपी वैद्यकीय मंडळ स्थापन करावे असे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात कायमस्वरूपी वैद्यकीय मंडळ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ३/०४/२०१९ रोजी आदेश दिले आहेत.

(२) याबाबत प्रत्येक जिल्ह्यात स्थायी वैद्यकिय मंडळ स्थापन करण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २४/०६/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथे मुलींसाठी शासकीय निरीक्षणगृह स्थापन करणेबाबत

**(१६) * ३५ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे मुलींचे शासकीय निरीक्षणगृहाची स्थापना करण्याची घोषणा मागील ३ वर्षापूर्वी शासनाने केली असून मुलींसाठी स्वतंत्र निरीक्षण गृह सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात फक्त अमरावती येथे मुलींचे स्वतंत्र शासकीय निरीक्षणगृह असून राज्यात इतर जिल्ह्यामध्ये मुलींसाठी किती स्वतंत्र निरीक्षणगृह निर्माण करण्यात आली वा किती घोषित करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात अमरावती येथे मुलींसाठी स्वतंत्र शासकीय निरिक्षणगृह आहे. तसेच स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणारी, १२ जिल्ह्यांमध्ये मुलींसाठीची स्वतंत्र १२ निरीक्षणगृहे निर्माण करण्यात आलेली असून ती कार्यरत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील सिंचनाचे आर्थिक मापदंडाचे निकष बदलण्याबाबत

**(१७) * ८२४ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणामध्ये स्वातंत्र्यानंतर सिंचनामध्ये फक्त १ टक्काच वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणामध्ये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये विशेषत: दापोली मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणात निधीचे वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणातील सिंचनाचे आर्थिक मापदंडाचे निकष बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांक : मापदंड २०१७/(४५२/२०१७)/ लपा-२, दिनांक १३ जुलै, २०१८ अन्वये लघु पाटबंधारे योजनांसाठी मापदंड प्रसृत करण्यात आले आहेत.

तसेच शासन पत्र क्रमांक : मापदंड-२०१९/(३७९/२०१९)/लपा-२, दिनांक ०७/११/२०१९ अन्वये लघु पाटबंधारे प्रकल्पांचे प्रचलित मापदंडामध्ये सुधारणा करण्याच्यादृष्टीने परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिव्यांगाचे बोगस प्रमाणपत्र देवून शासकीय सेवेचा गैरवापर केला जात असल्याबाबत

**(१८) * २१७ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात अनेक जिल्हा परिषद अंतर्गत काही कर्मचारी व अधिकारी खास करून शिक्षकांमध्ये दरवर्षी बदली व पदोन्नतीसाठी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांगाचे बोगस प्रमाणपत्र काढून शासकीय सेवेचा गैरवापर केला जात असल्याच्या तक्रारी अनेक संघटनांनी प्रशासनाकडे केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२), (३) व (४) याप्रकरणी जिल्हा परिषदांकडून नेमकी वस्तुस्थिती मागविण्यात आली आहे. जिल्हा परिषद कार्यालयांकडून वस्तुस्थिती प्राप्त झाल्यानंतर दिव्यांगाचे बोगस प्रमाणपत्र सादर झाल्याचे आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्याबाबत संबंधित जिल्हा परिषदांना कळविण्यात येईल.

-----------------

# कळमनुरी (जि.हिंगोली) शहरात उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१९) * ४३७ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) शहरात उपजिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक दिवसांपासून खोकला, आम्लपित्त व अनेक प्रकारच्या प्रतीजैविक तसेच आपत्कालीन परिस्थितीत लागणारे औषध मिळत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून त्यांना बाहेरुन औषधे विकत घ्यावी लागत असल्याने आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात ईसीजी व एक्सरे मशीनची सुविधा नसून वैद्यकीय अधीक्षक नसल्यामुळे सदर परिस्थितीची चौकशी करण्यात यावी अशी मागणी रुग्णांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, कळमनुरी, जि.हिंगोली येथे अत्यावश्यक औषधी व साहित्य सामग्रीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

(२) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, कळमनुरी, जि.हिंगोली येथे ईसीजी व एक्स रे मशीन सुविधा उपलब्ध आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय, औढा नागनाथ येथील वैद्यकीय अधीक्षक यांना उपजिल्हा रुग्णालय, कळमनुरी, जि.हिंगोली येथील वैद्यकीय अधीक्षक पदाचा पदभार देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील जिगांव प्रकल्पाला निधी मिळण्याबाबत

**(२०) * ४०७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील जिगांव प्रकल्पाची कामे गेल्या २३ वर्षापासून विलंबाने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून प्रकल्पाच्या कामाचा खर्च वाढत असल्याने प्रकल्प पूर्णत्वास जाण्याकरीता आणखी १० हजार कोटीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिगांव प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिगांव प्रकल्पाकरीता निधी उपलब्ध करण्यासाठी प्रकल्पाचा केंद्र शासनाच्या “बळीराजा जलसंजीवनी” योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. तसेच नाबार्ड कडून अर्थसहाय्य मिळविण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(३) प्रकल्पासाठी आवश्यक वनजमिनीची तत्वत: मान्यता दिनांक १२/११/२००८ मध्ये प्राप्त झाल्यानंतरच प्रकल्पाचे कामास सुरुवात करता आली. प्रकल्पासाठी १५९१४ हे. एवढे भूसंपादन अपेक्षित असून सन २०१३ चे नविन भूसंपादन कायद्यानुसार देय नुकसान भरपाईच्या तरतुदीत मोठी वाढ झाल्याने प्रकल्पाच्या भूसंपादनाच्या किंमतीत मोठी वाढ झाली, तसेच अपुरा कर्मचारी वर्ग व निधीची अल्प तरतुद यामुळे प्रकल्पाच्या पूर्णत्वास विलंब होत आहे.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(२१) * ६५८ श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची, खोलीची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेकडे इमारतींची डागडुजी, खोल्यांची दुरुस्ती व नवीन आवश्यक खोल्या बांधण्यासाठी निधी उपलब्ध नसून स्थानिक प्रशासनाने अतिरिक्त निधीची मागणी शासनाकडे करुनही निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नौरोसजी वाडिया मॅटर्निटी हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांना अनुदान मिळणेबाबत

**(२२) * ९७२ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नौरोसजी वाडिया मॅटर्निटी हॉस्पिटल वर्ष १९५८ मध्ये झालेल्या करारानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका व शासनाच्या अनुदानावर कर्मचाऱ्यांचे वेतन दिले जात असून करारानुसार मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा व सवलतींप्रमाणे रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन मिळते, हे खरे आहे आहे काय,

(२) असल्यास, सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर तो वाडिया मॅटर्निटी हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाव्या वेतन आयोगानुसार कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी निश्चित केली असून मुंबई महानगरपालिकेने ५० टक्के रक्कम दिली असून शासनाने ५० टक्के रक्कम दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी याबाबत श्री.प्रविण परदेशी, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी समितीची स्थापना केली असून सदर समितीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयाबाबतचा करार वर्ष १९२६ मध्ये करण्यात आलेला आहे. तसेच, शासन निर्णय, दिनांक १३ जानेवारी, २०१० अन्वये सहायक अनुदान सदर संस्थेस देण्यात येते. सदर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या निर्णयाच्या अनुषंगाने केली जाते. सदर रुग्णालयातील कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नाहीत. शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेली वेतनश्रेणी संरक्षण हे या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना लागू नाही. तसेच, रुग्णालयाचा असा निश्चित आकृतिबंध नाही. रुग्णालय प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय शासनाची पुर्वसंमती न घेता घेतला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक १३ जानेवारी, २०१० मधील तरतुदीच्या अनुषंगाने शासनामार्फत वेळोवेळी अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(४) दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयाद्वारे गठीत उच्चस्तरीय समितीची एक बैठक दिनांक १९/११/२०१९ रोजी झाली असून या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत नौरोसजी वाडिया मॅटर्निटी रुग्णालयाच्या प्रशासनास त्यांच्या अभिप्रायार्थ पाठविण्यात आली असून त्यांचे अभिप्राय अद्याप प्राप्त झालेले नाहीत. सदर अभिप्राय प्राप्त होताच ते समितीच्या पुढील बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळवट धरण (ता.खेड, जि.रत्नागिरी) धोकादायक झाल्याबाबत

**(२३) * ५८१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तळवट धरण प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धोकादायक बनले असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने धरणाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) धरणाच्या घळभरणीच्या भागातून रॉक टो च्या वरील बाजूस थोड्या प्रमाणात गळती माहे डिसेंबर, २०१९ चे क्षेत्रिय भेटीच्या वेळी निदर्शनास आली आहे. तथापि, त्यामुळे धरणास कोणताही धोका नाही. धरणाचे पावसाळापूर्वी व पावसाळयानंतर तपासणी करण्यात येत असून धरणाकडे दुर्लक्ष झाले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळांसाठी स्वतंत्र शिक्षणविस्तार अधिकारी नेमण्याबाबत

**(२४) * २२८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागामध्ये माहे डिसेंबर, २०१९ अखेर उर्दू शाळांसाठी स्वतंत्र शिक्षणविस्तार अधिकारी नेमण्याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणतीच कार्यवाही केली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) सद्य:स्थितीत राज्यातील सर्व जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागामध्ये उर्दू शाळांसाठी स्वतंत्र शिक्षणविस्तार अधिकारी नेमणे ही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## राज्यातील वृध्द कलावंताच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(२५) * ६३६ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून ज्येष्ठ रंगकर्मींना मिळणारे मानधन तुटपुंजे असून “अ” श्रेणीसाठी दरमहा रुपये २,१००/- मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “अ” श्रेणीसाठी रुपये १०,०००/- “ब” श्रेणीसाठी रुपये ७,५००/- आणि “क” श्रेणीसाठी रुपये ५,०००/- मानधन वाढवून द्यावे अशी या वृध्द कलावंताची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीची दखल घेऊन शासनाने या वृध्द कलावंताचे मानधन वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये विषयांकित मानधनात वाढ करण्यात आलेली असून अ श्रेणीसाठी रुपये ३,१५०/- इतके मानधन दिले जाते.
(२) हे खरे आहे.

कलावंत मानधनात वाढ व्हावी अशी मागणी काही वृध्द कलावंतांच्या संघटनांनी केली आहे.
(३) राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजनेंतर्गत दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रचलित मानधनात दिडपट वाढ करण्यात आली असून सद्य:स्थितीत अ श्रेणीसाठी रुपये ३,१५०/-, ब श्रेणीसाठी रुपये २,७००/- आणि क श्रेणीसाठी रुपये २,२५०/- असे मानधन दिले जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांजरा-माळण नदी जोड प्रकल्पासाठी आवश्यक निधी तसेच जल उपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत

**(२६) * ८९५ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील पांजरा-माळण नदी जोड प्रकल्पाचे सर्वेक्षण करून प्रकल्पाचा अहवाल शासनास सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प निधी अभावी तसेच जल उपलब्धता प्रमाणपत्र नसल्यामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी आवश्यक निधी तसेच जल उपलब्धता प्रमाणपत्र उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सदर नदी जोड प्रकल्पास सविस्तर सर्वेक्षण करण्यासाठी अंदाजपत्रकास जिल्हा नियोजन विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून क्षेत्रिय कार्यालयामार्फत सविस्तर सर्वेक्षण करण्यात आले आहे. शासन निर्णय, दिनांक २३/०८/२०१७ अन्वये जिल्हास्तरीय नदी जोड योजनेचा जिल्हा योजनेत समावेश करुन याबाबत संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचेमार्फत जलसंपदा विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत, त्यानुषंगाने जिल्हाधिकारी यांचेमार्फत पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

-----------------

## जवळेश्वर (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीत समाविष्ट असलेली धावडेवाडीवस्ती डोंगरीवस्ती म्हणून घोषित करण्याबाबत

**(२७) * १६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जवळेश्वर (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीत समाविष्ट असलेली धावडेवाडीवस्ती ही समुद्रसपाटीपासून उंचावर वसलेली डोंगरवस्ती असून ही वस्ती डोंगरवस्ती म्हणून घोषित करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही वस्ती डोंगरावर वसलेली असल्याने या ठिकाणी उन्हाळी हंगामात पाणीपुरवठ्याचे नैसर्गिक स्त्रोत उपलब्ध नसल्याने अपुरा पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, गल्ल्या अर्धवट तसेच सार्वजनिक दिवाबत्तीची सोय नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वस्ती डोंगरीवस्ती घोषित करुन सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

डोंगरी विभाग विकास कार्यक्रम सन १९९१-९२ पासून राबविण्यात येत असून, विशिष्ट निकषांच्या आधारे डोंगरी क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुका हा पूर्णगटात समाविष्ट असून, पूर्णगटामध्ये तालुक्यातील सर्व गावांचा डोंगरी क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

(२) धावडेवाडी या वस्तीत सद्य:स्थितीत उन्हाळी हंगामातही पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध आहे. सदर वस्तीपर्यंत डांबरी रस्ता उपलब्ध आहे.

अंतर्गत गल्ल्यांची कामे प्रगतीत आहेत. सार्वजनिक दिवाबत्ती (स्ट्रीट लाईट) नाही.

(३) ग्रामपंचायतीकडून उर्वरित सुविधांबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम व अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांना वेतन मिळण्याबाबत

**(२८) * ९५७ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागात नव्याने निर्माण झालेल्या वाशिम व अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतनापासून चार-चार महिने वंचित रहावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन मिळण्यासाठी वारंवार मागणी होवूनही शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेळेवर वेतन मिळावे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात अवैधरित्या शस्त्रक्रिया करुन महिलांची गर्भपिशवी काढणाऱ्या रुग्णालयांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२९) * ६७९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.प्रसाद लाड, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५०० ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात १३ हजार ऊसतोड महिलांचे गर्भाशय काढण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आल्यावर लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मासिक पाळीच्या काळात मोलमजुरी करता येत नसल्याने ३० हजाराहून अधिक ऊसतोड महिलांचे गर्भाशय काढल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महिलांना कॅन्सरची भिती दाखवून त्यांची आर्थिक लूट करणे व गर्भाशय काढणे या व्यवसायाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने महिलांना कॅन्सरची भिती दाखवून त्यांची आर्थिक लूट करुन गर्भाशय काढणाऱ्या डॉक्टर व रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) चौकशीत गर्भपिशवी काढण्याचे मुख्य कारण PID, Chronic Cervicities, DUB (मासिक पाळीचे त्रास), Fibroid, Prolapse हे असल्याचे आढळून आले आहे. डॉक्टरांनी गर्भपिशवी काढण्यास प्रवृत्त केल्याबाबत कोणत्याही महिलांनी तक्रार केली नाही, सदर निर्णय महिलांचा व त्यांच्या कुटुंबियांचा होता.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील मेडीकल व मेयो रुग्णालयात लहान मुलांच्या शस्त्रक्रियेकरीता युनिट सुरु करण्याबाबत

**(३०) * १३५ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेडीकल व मेयो रुग्णालयात लहान मुलांच्या गंभीर आजारावरील उपचारा (Pediatric critical care) करीता शस्त्रक्रियेची सोय उपलब्ध नसल्यामुळे लहान मुलांना मुंबई येथील वाडिया रुग्णालयात न्यावे लागत असल्याने सदर रुग्णालयामध्ये उक्त सोय उपलब्ध करून देण्यासंबंधी पूर्व विदर्भ सामाजिक संघटनेच्या माध्यमातून तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मेडीकल व मेयो रुग्णालयात लहान मुलांच्या गंभीर आजारावरील गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेकरीता युनिट सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) सदरचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे लहान मुलांच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया बालरोगचिकित्साशास्त्र व बालशल्यचिकित्सा विभागामार्फत नियमितपणे केल्या जातात.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो हॉस्पिटल) नागपूर येथे बालरोगशस्त्रक्रिया विभाग कार्यरत आहे. सदर रुग्णालयातील ज्या बालरुग्णांना गुंतागुंतीच्या उपचारांची आवश्यकता असते त्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे पुढील उपचारासाठी संदर्भीत करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील अंगणवाड्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३१) * १२८८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यात ११७ अंगणवाड्यांमध्ये ६ हजाराहून अधिक मुलांची पटसंख्या असून अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे ती कमी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३० अंगणवाड्यांना इमारती नसून १८ अंगणवाड्याच्या दुरवस्था झाल्याने दुर्घटनेच्या कारणामुळे लहान मुलांना कधी समाज मंदिरात तर कधी अन्य ठिकाणी दप्तराचे ओझे घेऊन फिरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अंगणवाड्यांना सुसज्ज इमारती उभारण्याच्या दृष्टीने तसेच त्या सुस्थितीत ठेवण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजना, सुधागड पाली, जि.रायगड या प्रकल्पामध्ये एकूण १५६ अंगणवाडी केंद्र कार्यान्वित आहेत. त्यापैकी १२६ अंगणवाडी केंद्रांच्या स्वत:च्या इमारती आहेत. प्रकल्पातील एकूण ३० अंगणवाडी केंद्रांना इमारती नसून त्यापैकी १२ अंगणवाडी केंद्र धोकादायक असल्याने बालकांचे सुरक्षेच्या दृष्टीकोनांतून पर्यायी व्यवस्था म्हणून समाज मंदीर, प्राथमिक शाळा व भाड्याच्या इमारतीत अंगणवाडी केंद्र सुरू आहेत.
(३) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये DPDC मधून नवीन अंगणवाडी बांधकामासाठी रुपये ५.०० कोटी वाढीव निधीची मागणी केली आहे. सदरचा निधी प्राप्त होताच सुधागड तालुक्यातील अंगणवाड्यांना प्राधान्याने मंजूरी देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाई जेरबाई वाडिया आणि नौरोजी वाडिया, परळ (मुंबई) रुग्णालयाचे अनुदान थकित असल्याबाबत

**(३२) * १७३१ श्री.रामनिवास सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.महादेव जानकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील बाई जेरबाई वाडिया आणि नौरोजी वाडिया या वाडिया ट्रस्टच्या ९० वर्षापासून सुरु असलेल्या रुग्णालयांना शासन व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मिळणारे अनुदान थकित असल्यामुळे रुग्णालय प्रशासनाने रुग्णालय बंद करण्याचा निर्णय घेतला असून बाहयरुग्ण विभागापासून ते शस्त्रक्रिया विभागापर्यंत सर्व विभाग बंद करण्याची प्रक्रिया सुरु केल्याचे तसेच ३०० हून अधिक रुग्णांना सक्तीने घरी सोडले असून नवीन रुग्णांची भरती देखील थांबविल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ वर्षापूर्वी महापालिकेने सदर रुग्णालयांच्या वैद्यकीय खर्चाच्या बाबीमध्ये अनियमितता असल्याने रुग्णालयांचे अनुदान बंद केले तसेच रुग्णालयास राज्य शासनाकडूनही अनुदान मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाई जेरबाई वाडिया रुग्णालयाचे रुपये ३० कोटी आणि नौरोजी वाडिया रुग्णालयाचे १०५ कोटी असे एकूण रुपये १३५ कोटी पालिकेकडे थकित असून उपचारासाठी लागणारे साहित्य आणि औषधांची थकबाकी कोटीपर्यंत गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील वाडिया रुग्णालय हे प्रसुती आणि बालरोगावर अत्याधुनिक आणि वाजवी दरात उपचार देणारे एकमेव रुग्णालय असून त्यास अनुदान न मिळाल्याने ते सेवा देण्यास असमर्थ असल्याने रुग्णालयात राज्यातून येणाऱ्या अनेक गरीब रुग्णांची व बालकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन व मुंबई महानगरपालिका यांच्याकडून थकित असलेल्या अनुदानासंदर्भात तसेच रुग्णालय प्रशासनाच्या अनियमिततेसंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू दोन्ही रुग्णालयातून पूर्ववत नियमित आरोग्यसेवा अखंडपणे सुरु राहाण्यासाठी तसेच शासन, महानगरपालिका व रुग्णालय प्रशासन यांच्यात समन्वय राखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून वेळोवेळी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दिनांक १६/०१/२०२० अन्वये रुपये २४ कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) शासन निर्णय, दिनांक ८ मार्च, २०१९ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

-----------------

## पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत येणाऱ्या रस्त्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * १७६८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्ये पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामांमध्ये अधिकारी व ठेकेदार संगनमत करून रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची करत असल्याने दरवर्षी शासनाच्या कोट्यवधी निधीचा गैरव्यवहार होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे होऊन रस्त्यांची दुरवस्था झाली असून स्थानिकांनी तक्रार करूनही संबंधित अधिकारी कोणत्याच प्रकारची कारवाई करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली सर्कलमध्ये येणाऱ्या खेड तालुक्यातील बेरळ-बोरज-कोंडिवली या ११ कि.मी. रस्त्यांचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत करण्यात आले असून या कामाची तपासणी न करता सात कोटीचे देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्त्यांची निकृष्ट कामे करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) होय, सदर तक्रारीबाबत चौकशी सुरू असून अहवाल प्रतिक्षाधीन आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

सदर कामाची SQM व SSQM यांनी गुणवत्ता तपासणी केली असून त्यांनी कामास कोणताही प्रतिकूल शेरा दिलेला नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विदर्भ विकास मंडळाच्या प्रस्तावांना मंजुरी मिळण्याबाबत

**(३४) * १८०५ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विदर्भ विकास मंडळाच्या महत्वपूर्ण प्रस्तावांना अनेक महिन्यांपासून मंजुरी मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भ विकास मंडळाच्या पाच अहवालांना प्रशासकीय मंजुरी न मिळाल्याने जलस्त्रोतांचा उपशक्तीवर झालेल्या अध्ययनाचा बाकी राहिलेला निधी परत जाणार असून सहा वर्षानंतर मिळालेला विशेष निधी पण वाटप न झाल्याने परत जाणार असल्यामुळे विदर्भ विकास संदर्भात अध्ययन आणि संशोधनाचे कामकाज बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील विदर्भ विकास मंडळाच्या महत्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) नियोजन विभागाच्या दिनांक १९ मार्च, २०१९ रोजीच्या पत्रानुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित विकास मंडळामार्फत हाती घ्यावयाच्या अभ्यास अहवालांचे प्रस्ताव सादर करताना कोणते मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे, याबाबत सुस्पष्ट मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. विदर्भ विकास मंडळाकडून सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात प्रस्तावित अभ्यास अहवालांचे प्रस्ताव विहित मार्गदर्शक सुचनांनुसार सादर झालेले नसल्यामुळे त्यांना मंजुरी देण्यात आलेली नाही.

नियोजन विभाग, शासन निर्णय, दिनांक २३ जुलै, २०१९ नुसार "विशेष निधी" मंजूर करताना जिल्हाधिकारी यांनी "प्रशासकीय मान्यता" दिलेल्या कामांनाच शासनाकडून निधी वितरीत केला जातो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय व निमशासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या महिला अधिकारी/कर्मचारी यांच्या वैद्यकीय रजेबाबत

**(३५) * १९५६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय व निमशासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या महिला अधिकारी/कर्मचारी यांना बाळंतपणाकरीता ६ महिन्याची वैद्यकीय रजा दिली जात असून सदर रजा ही दोन अपत्यांकरीता मंजूर करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही कारणास्तव अपघाताने गर्भपात झाल्यास, मुल जन्मास न आल्यास सदरील महिलेची बाळंतपणासाठीची वैद्यकीय रजा ही कपात होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एक अपत्यानंतर दुसरे मुल जन्मास येण्यावेळी नैसर्गिक अपघाताने मुल मृत पावले किंवा जन्माला आले नाही तर पुन्हा महिला गरोदर राहिल्यास तिसऱ्या वेळी वैद्यकीय रजेची मागणी केल्यास तिला बाळंतपणासाठी वैद्यकीय रजा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अशा महिलांना बाळंतपणासाठी वैद्यकीय रजा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, गर्भपात झाल्यास बाळंतपणासाठी अनुज्ञेय असलेल्या रजेमध्ये कपात करण्यात येत नाही. तथापि, अशा प्रकरणी गर्भपाताकरीता संपूर्ण सेवेच्या कालावधीमध्ये कमाल ४५ दिवस इतकी प्रसूती रजा अनुज्ञेय आहे.

(३) हे खरे नाही. दुसरे मूल जन्माला येण्यावेळी नैसर्गिक अपघाताने मृत झाल्यास महिलेस गर्भपाताची प्रसूती रजा अनुज्ञेय राहील व अशा प्रकरणी तिसऱ्या वेळी बाळंतपणासाठी वैद्यकीय रजा मिळते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा मिळण्याबाबत

**(३६) * १९७४ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेवर अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना शासकीय दर्जा देण्यासाठी दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना शासकीय दर्जा देऊन सेविकेला तृतीयश्रेणी तर मदतनीस यांना चतुर्थश्रेणीमध्ये समाविष्ट करुन त्यांना पंतप्रधान जीवन विमा योजना लागू करण्याबाबतच्या मागण्या आंदोलन करणाऱ्या अंगणवाडी सेविकांनी केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) एकात्मिक बालविकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या मानधनी कर्मचारी आहेत. ही सेवा अंशकालीन असून त्यांना शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा अनुज्ञेय नाही. तसेच केंद्र शासनाच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व अंगणवाडी कार्यकर्ती विमा योजना या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी केंद्र शासनास माहिती सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खोडाळा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे व आवश्यक सोयी सुविधा पुरविण्याबाबत

**(३७) * २०३४ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोडाळा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात श्रेणी-१ व श्रेणी-२ च्या वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तसेच आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्याबाबत आरोग्य संचालक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हाधिकारी, पालघर व मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास समर्थन संस्थेने लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तसेच सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यात आली असून त्यांचेमार्फत जनतेस आरोग्य सुविधा दिल्या जात आहेत.

तसेच गट-क व ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे जिल्हा आरोग्य संवर्गातील पदे असल्याने ग्रामविकास विभागामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात कुष्ठरोगाचे रुग्ण आढळून आल्याबाबत

**(३८) * ८५७ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यात एका वर्षात ६७६ कुष्ठरोगाचे रुग्ण आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे शहरासह कल्याण, नवी मुंबई, उल्हासनगर, मीरा-भाईंदर या शहरांमध्ये “मायक्रोबॅक्टेरिअम लेप्री” या जंतूंचा फैलाव होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुष्ठरोग रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाचा राज्य व जिल्हास्तरीय सभेमध्ये कार्यक्षेत्रनिहाय नियमितपणे आढावा घेतला जातो व जिल्हास्तरावरुन प्रत्यक्ष भेटीद्वारे पडताळणी केली जात आहे.

सदर शहरांमध्ये स्थलांतरीत लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्याने दाट लोकवस्ती व दिर्घ कालावधीचा अधिशयन काळ यामुळे कुष्ठरोगाचे रुग्ण आढळत आहेत.

उपाययोजना :-

- विविध माध्यमांद्वारे जनसामान्यांपर्यंत कुष्ठरोगाबाबतची शास्त्रोक्त माहीती देवून कुष्ठरोगाच्या तपासणीसाठी रुग्णांनी स्वत:हून पुढे येण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
- शहरी भागात अवैद्यकीय सहाय्यक व ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी, आशा यांच्यामार्फत संशयित रुग्ण शोधण्यात येतात. निदान निश्चिती झालेनंतर त्वरीत बहुविध औषधोपचार दिला जातो.
- नविन शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांच्या सर्व सहवासितांची तपासणी केली जाते. सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व सहवासितांना रिफांम्पीसीन या गोळीची एक मात्रा दिली जाते.
- शाळेतील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगविषयक आरोग्य शिक्षण दिले जाते.
- सन २०१६-१७ पासून दरवर्षी ठाणे जिल्ह्यात “कुष्ठरुग्ण शोध मोहिम व स्पर्श कुष्ठरोग जनजागृती मोहिम” राबविण्यात येते आहे या मोहिमेमध्ये आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत औषधोपचार देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरज (जि.सातारा) गावातील शेतकरी यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(३९) * २९२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सातारा) गावचे शेतकरी श्री.रामचंद्र सोनावणे यांची १८ एकर जमीन लघुपाटबंधारे विभागाने प्रकल्पासाठी ३० वर्षापूर्वी संपादित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संपादित करण्यात आलेल्या जमिनीवर पाटबंधारे विभागाने तलाव तसेच शाळा उभारली असून उक्त जागा संपादित करताना श्री.सोनावणे यांना कोणताही मोबदला अथवा जमीन देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.सोनावणे यांनी गेली ३० वर्षापासून तत्कालीन मा.मुख्यमंत्री, मा.पंतप्रधान व मा.राष्ट्रपतींकडे दाद मागूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने श्री.सोनावणे यांना मोबदला अथवा जमीन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लाखनी (जि.भंडारा) पंचायत समिती अंतर्गत सिदीपार (मुडीपार) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एकच शिक्षक कार्यरत असल्याबाबत

**(४०) * ४७७ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखनी (जि.भंडारा) पंचायत समिती अंतर्गत सिदीपार (मुडीपार) या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गात एकच शिक्षक कार्यरत असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आंदोलन केल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेली शिक्षकांची मागणी पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून दिनांक १९/१२/२०१९ ला तात्पुरते शैक्षणिक कार्य करण्याकरीता एक शिक्षक पाठविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या मागास भागातील अनुशेष भरुन काढण्याबाबत नेमण्यात आलेली डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल अंमलबजावणीबाबत

**(४१) * २२२ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४८०५२ ला दिनांक २४ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या मागास भागातील अनुशेष भरुन काढण्यासाठी शासनास शिफारशी सुचविण्याकरीता शासनाने नेमलेल्या डॉ.विजय केळकर समितीने दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व निर्णय घेण्यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीच्या अहवालातील शिफारशी व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन, शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात दिनांक १७ जानेवारी, २०१५ व दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मंत्रिमंडळ उप समिती गठित करण्यात आली आहे. सदर मंत्रिमंडळ उप समितीने आपला अहवाल मंत्रिमंडळास सादर करावयाचा आहे.

-----------------

## सोंड्याटोला उपसा सिंचन प्रकल्प (जि.भंडारा) येथे सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्याबाबत

**(४२) * ७८७ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील महत्वाकांक्षी सोंड्याटोला उपसा सिंचन प्रकल्पातील सात जुन्या सुरक्षारक्षकांना कारण न देता नोकरीवरून काढून टाकण्यात आले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोंड्याटोला प्रकल्पावर दोनच सुरक्षारक्षक कार्यरत असून अन्य सुरक्षारक्षकांची नियुक्ती झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

सोंड्याटोला उपसा सिंचन प्रकल्पावर शासकीय सेवेत असलेले सुरक्षारक्षक नेमलेले नाहीत. सदर काम कंत्राटी पध्दतीने सन २०१८-१९ मध्ये यांत्रिकी विभागामार्फत करण्यात आले होते. तसेच, सन २०१९-२० मध्ये नविन कंत्राटदारास काम मिळाल्यामुळे संबंधित कंत्राटदाराने स्वत:चे सुरक्षारक्षक नेमलेले आहेत. त्यामुळे कारण न देता नोकरीवरून काढून टाकण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) हे खरे नाही.

सोंड्याटोल्या प्रकल्पावर अंदाजपत्रकानुसार एका दिवसात ९ सुरक्षारक्षक प्रस्तावित असून सद्य:स्थितीत प्रकल्पावर प्रथम पाळीला ३, व्दितीय पाळीला ३, तृतीय पाळीला ३ असे एका दिवसाला एकूण ९ सुरक्षारक्षक कार्यरत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधीचा विनियोग न करता समर्पित केल्याबाबत

**(४३) * ३ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनास ४० हजार कोटी इतका निधी प्राप्त झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन राज्य शासनाने सदर निधीचा कोणताही विनियोग न करता केंद्र शासनाकडे प्राप्त निधी पूर्णत: समर्पित केल्याचे दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा निधी कोणत्या योजनेसंदर्भात राज्य शासनास प्राप्त झाला होता व कधी तसेच सदरचा निधी कोणताही विनियोग न करताच केंद्र शासनास समर्पित करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पैठण येथील जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्याच्या दुरुस्तीबाबत

**(४४) * ७७१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण येथील जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यांतर्गत वितरीका क्र. २२, २३, २४ व २५ यांची दुरवस्था झाली असून जायकवाडीच्या यांत्रिकी विभागाकडून वितरीकांच्या दुरुस्ती कामामध्ये अनियमितता झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

सन २०१९-२०२० मध्ये मंजूर पाखरण कार्यक्रमाप्रमाणे वितरीका क्रमांक २२, २३, २४ व २५ यांच्या मातीकाम, भरावकाम, झाडे-झुडपे काढणे इत्यादी कामे यांत्रिकी विभागामार्फत प्रगत आहे. सदरच्या कामात अनियमितता आढळून आलेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा परिषद शाळांच्या बांधकाम व दुरुस्तीसाठीचा प्राप्त निधी समर्पित केल्याबाबत

**(४५) * १३१५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या १३२ वर्गखोल्या बांधण्यासाठी १२ कोटी ८५ लाख ६८ हजार रुपयांचा निधी जिल्हा नियोजन समितीद्वारे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन प्रशासकांनी या शाळांच्या बांधकाम व दुरुस्तीच्या कामांकडे दुर्लक्ष केल्यामुळे सदर निधीचा कोणताही विनियोग न करता शासनाकडे प्राप्त निधी समर्पित केला गेला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ठाणे जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांच्या बांधकाम व दुरुस्तीसाठी प्राप्त निधीचा कोणताही विनियोग न करण्याबाबत संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या नवीन वर्ग खोल्या बांधण्यासाठी रुपये ८००.०० लक्ष आणि शाळा दुरुस्तीसाठी रुपये ४००.०० लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

(२) व (३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाच्या “ब” आणि “क” प्रवर्गातील पदभरती व इतर मागण्यांबाबत**

**(४६) * ५५६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ४१२७४ ला दिनांक ५ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या “ब” आणि “क” प्रवर्गातील पदभरती प्रक्रिया केंद्र शासनाच्या धोरणानुसार करण्याचे शासनाचे नियोजन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनातील कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा करुन त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० तसेच “ब” आणि “क” प्रवर्गातील पदभरती गुणवत्तेनुसार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) व (२) केंद्र शासनाने विवक्षित “ब” संवर्गातील राजपत्रित, “ब” वर्ग अराजपत्रित व “क” संवर्गातील पदे सामायिक परिक्षेद्वारे गुणवत्तेनुसार भरण्यासंदर्भात सर्व राज्य सरकारांकडून दिनांक ०५/१२/२०१९ च्या पत्रान्वये माहिती मागविली आहे. या संदर्भात केंद्र शासनाचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नसल्याने केंद्र शासनाच्या धोरणानुसार पदभरती प्रक्रिया करण्याचे नियोजन करण्याचा सध्या प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनातील कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा दिनांक २९/०२/२०२० पासून लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच केंद्राप्रमाणे व भारतीय प्रशासनिक सेवेप्रमाणे सेवानिवृत्तीचे वय ६० करण्याबाबत श्री.बी.सी.खटुआ (सेवानिवृत्त भा.प्र.से. अधिकारी) समितीने तयार केलेला अहवाल शासनाचे निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेळेत निवृत्तवेतन मिळणेबाबत

**(४७) * ४३ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोषागार विभागाच्या कारभारामुळे मराठवाडा विभागात १२००० सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या संचिका कोषागार विभागाकडे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोषागार विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी असल्याने लिपिक कर्मचारी किरकोळ त्रूटी काढून सेवा पुस्तिका मूळ विभागाकडे परत पाठवित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्याधीग्रस्त व दिव्यांग सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यामुळे आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तात्काळ निवृत्तीवेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) ग्रामसडक योजनेंतर्गत झालेल्या रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४८) * ९५४ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामसडक योजनेंतर्गत कळंबणी बुद्रुक-शिरवली-आपेडे काजवेवाडी या सुमारे ९ कि.मी. रस्त्यांचे काम दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी कागदोपत्री पूर्ण झालेले असून या रस्त्यांसाठी रुपये ५ कोटी ३६ लक्ष ६२ हजार इतका निधी खर्च करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या निधीतुन रत्नागिरी जिल्ह्यात झालेल्या ग्रामसडक योजनेच्या रस्त्यांच्या कामांची निविदा ऑनलाईन पध्दतीने काढली गेली असली तरी ही कामे परजिल्ह्यातील ठेकेदारांच्या नावे असून सदर कामे स्थानिक ठेकेदारांकडून करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामसडक योजनेसाठी कोटयवधीचा निधी प्राप्त झालेला असून ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामांच्या दर्जेबाबत सातत्याने तक्रारी येत असल्यामुळे ग्रामसडक योजनेंतर्गत झालेल्या सर्वच कामांची स्वतंत्ररित्या चौकशी करुन गैरव्यवहाराला जबाबदार असणाऱ्या दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४९) * १६५३ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात २०० ते ३०० रुग्ण उपचारासाठी येत असून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदामुळे रुग्णांना उपचार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयात कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांना रुग्णांवर उपचार करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची तसेच इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १४/०१/२०२० रोजी वैद्यकीय अधिकारी यांची दोन रिक्त पदे भरण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे दिनांक १४/०१/२०२० रोजी भरली आहेत.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(५०) * ११५७ श्री.गोपिकिशन बाजोरीया, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांना विविध प्रकारचे निधी शासनाने दिलेले असतानाही अकोला जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतीची व खोल्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची डागडुजी व खोल्यांची दुरुस्ती निधी अभावी प्रलंबित असून शासनाने शाळेच्या विकासाकरीता दिलेला निधीचा प्रशासक, सरपंच, सचिव आदिंच्या संगनमताने गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन शाळेच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत

**(५१) * ६५९ श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या एकूण तीन उपजिल्हा व चौदा ग्रामीण रुग्णालय हे वर्ग-१ व वर्ग-२ वैद्यकीय अधिकारी यांच्याविना कार्यरत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात वर्ग-१ व वर्ग-२ हे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे गरीब रुग्ण आवश्यक त्या वैद्यकीय सेवेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्ग-१ व वर्ग-२ चे वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत तसेच प्रलंबित प्रस्तावास शासन मंजुरी देणार काय व कधीपर्यंत देणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यात एकूण तीन उपजिल्हा रुग्णालय व चौदा ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित आहेत. सदर रुग्णालयामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर २३ : ६७७००-२०८७००) व (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर २० : ५६१००-१७७५००) एकूण ७० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४५ पदे भरलेली आहेत. तसेच रिक्त असलेली पदे २३ बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत भरलेली आहेत. अशी एकूण ६८ पदे भरलेली आहेत.

तसेच सोलापूर जिल्हयांतर्गंत उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयात आयपीएचएस व पायलट प्रोजेक्ट अंतर्गत स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ-१२, बालरोगतज्ञ-११ व बधिरीकरणतज्ञ-१३ यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयांतर्गत उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत गरीब रुग्णाना आवश्यक त्या वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.

(३) व (४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर २३ : ६७७००-२०८७००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर २० : ५६१००-१७७५००) मधील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नदीजोड प्रकल्पास मान्यता देण्याबाबत

**(५२) * १६०१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिवित व आर्थिक हानी होऊन काही भागात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्यासह इतर दुष्काळी भागाला पाणी उपलब्ध करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी न मिळाल्यास राज्य शासनामार्फत सुमारे १३ ते १४ हजार कोटी रुपये उपलब्ध करण्याबाबतचा निर्णय माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व यासाठी लागणारा निधी कशाप्रकारे व किती कालावधीत उपलब्ध करण्यात येणार आहे तसेच उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, राज्यात असलेल्या प्रमुख पाच नद्या व त्यांची उपखोरे यांचा एकत्रित जल आराखडा तयार करण्याची कायदेशीर तरतूद करुन नदीजोड प्रकल्प आराखडा तयार करुन मान्यता देण्याबाबत तसेच निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

आंतरराज्यीय दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प व राज्यांतर्गत नार-पार-गिरणा, पार-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी हे नदीजोड प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून न घेता राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राज्याच्या निधीतून हाती घेण्यास जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दिनांक १९/०९/२०१९ अन्वये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

(२) आंतरराज्यीय दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प व राज्यांतर्गत नार-पार-गिरणा, पार-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी हे नदीजोड प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून न घेता राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राज्याच्या निधीतून हाती घेण्यास, सदरील प्रकल्प विशिष्ट प्रकल्प म्हणून राबविण्यासाठी निधी वाटपाबाबत सदर प्रकल्पांना मा.राज्यपालांच्या सुत्राबाहेर ठेवण्याची विनंती मा.राज्यपालांना करणेस तसेच उल्हास, वैतरणा, नार-पार व दमणगंगा खोऱ्यातून प्रस्तावित गोदावरी खोरे व गिरणा उपखोरे वळण योजनांचे सविस्तर सर्वेक्षण/अन्वेषणाचे काम हाती घेणेस व वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेत भूसंपादन टाळणेसाठी कालव्याऐवजी नलिका/बोगदा प्रस्तावासाठी फेरसर्वेक्षण हाती घेण्यास जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दिनांक १९/०९/२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातून अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविण्यासाठी एकात्मिक राज्य जल आराखड्यात प्रस्तावित योजनांबाबत प्राथमिक अभ्यास करणेसाठी जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दिनांक १७/०९/२०१९ अन्वये समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने प्राथमिक अभ्यास अहवाल शिफारशीसह शासनास दिनांक ३१/१०/२०१९ रोजी सादर केला आहे. समितीने शिफारस केलेल्या योजनांचे सर्वेक्षण, अन्वेषण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबतची कार्यवाही प्रगतित आहे.

उपरोक्त नदीजोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर व प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर कालबध्द निधी उपलब्ध करणे अपेक्षित आहे.

(३) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ कलम १६ मधील तरतूदीनुसार राज्यातील सहा प्रमुख नदी खोऱ्यांचा जल आराखडा एकत्रित करून एकात्मिक राज्य जल आराखड्यास राज्य जल परिषदेच्या दिनांक ११/०२/२०१९ रोजी झालेल्या सहाव्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर जल आराखड्यात प्रस्तावित नदीजोड योजनांचा समावेश असून सदरील प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान केलेनंतर निधीची तरतूद होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोवंडी (मुंबई) येथील चारु या खाजगी रुग्णालयात बोगस डॉक्टरांना पोलिसांनी अटक केल्याबाबत

**(५३) * ८५० श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी, मुंबईतील शिवाजीनगर येथील चारु या खाजगी रुग्णालयात कोणतीही वैद्यकीय पदवी नसतानाही लिंगनिदान व गर्भपात करणाऱ्या दोन बोगस डॉक्टरांना पोलिसांनी अटक केली असल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, एका विशेष मोहिमेंतर्गत गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी मुंबई शहरातील विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत विलेपार्ले, मालाड, जुहू या परिसरातील पाच बोगस डॉक्टरांना अटक करण्यात आल्याचेही माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दहावी ते बारावीपर्यंत शिक्षण घेवून कुठलीही वैद्यकीय पदवी नसताना सदर बोगस डॉक्टर रुग्णांना बरे करण्याचे आश्वासन देऊन त्यांच्याकडून मोठी रक्कम घेवून फसवणूक करीत असल्याच्या घटना राज्यात इतरत्रही घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात विशेषत: मुंबई येथील बोगस डॉक्टरांवर कारवाई करुन त्यांचा विविध ठिकाणी सुरु असलेला व्यवसाय रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) वैद्यकीय पदवी किंवा वैद्यकीय व्यवसाय करण्याचे परवाने नसताना डॉक्टर असल्याचे भासवून बेकायदेशीर हॉस्पिटल चालवून लिंग निदान व गर्भपात करणाऱ्या बोगस डॉक्टर व त्याची मदतनीस महिला यांच्याविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिनांक १०/०७/२०१९ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली होती.

(२) डिसेंबर, २०१९ ते जानेवारी, २०२० या दोन महिन्यामध्ये एकूण दहा बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल करून अटक करण्यात आली होती.

(३) राज्यात इतरत्रही बोगस वैद्यकीय व्यवसायीक आढळून आले आहेत.

(४) बोगस वैद्यकीय व्यवसायीकांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधकात्मक कार्यवाही करण्याकरीता जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समित्यांची स्थापना दिनांक ०७/०२/२००० च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. तसेच मुंबई शहर/उपनगर जिल्हासाठी पोलीस आयुक्त मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५/१२/२००१ च्या शासन निर्णय अन्वये पुनर्विलोकन समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समित्या जिल्हयातील बोगस व्यवसायीकांचा आढाव घेवून त्यांच्याविरूध्द न्यायालयात खटले दाखल करण्याची कार्यवाही करतात.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील आर्थिक गुन्हे शाखा मुंबई यांच्यामार्फत महानगरपालिका मुंबई व संबंधित पोलीस ठाणे यांच्याशी समन्वय साधून व नियोजन करून बृहन्मुंबईतील बोगस वैद्यकीय व्यवसायाकांचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. बृहन्मुंबईमध्ये सन २०१९ ते जानेवारी, २०२० अखेरपर्यंत बोगस डॉक्टर संदर्भात प्राप्त तक्रारीवरून २३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच राज्यात याच कालावधीत ५८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोहरा (ता.अमळनेर, जि.जळगांव) येथील साने गुरुजी जलउपसा सिंचन योजनेकरीता निधी मिळण्याबाबत

**(५४) * ९०६ श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ४८२४२ ला दिनांक १ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोहरा (ता.अमळनेर, जि.जळगांव) निम्न तापी प्रकल्प लाभक्षेत्रातील अस्तित्वातील साने गुरुजी जलउपसा सिंचन योजना पुनर्स्थापित करून कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता दिनांक २५ जून, २०१९ रोजी मिळाल्यानंतरही सदर योजनेस शासनाने स्थगिती दिल्यामुळे निविदा प्रक्रिया राबविण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांना स्थगिती देण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, सदर कामांना दिलेली स्थगिती रद्द करण्याबाबत तसेच निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) जलसंपदा विभागांतर्गत चालू अर्थसंकल्पीय वर्षात (सन २०१९-२०२०) ज्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, सदर योजना अद्याप सुरु / कार्यान्वित झालेल्या नाहीत अशा योजनांचा आढावा घेऊन त्यांना स्थगिती देण्याबाबतची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि, अद्यापपावेतो याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात लाक्षणिक तरतूद उपलब्ध होणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी रुग्णालयांस कृत्रिम सांधा रोपणाच्या शस्त्रक्रियेस परवानगी देण्याबाबत

**(५५) * १८९० डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य अभियानांतर्गत प्रत्येक तालुकास्तरावर गरीब रुग्णांवर उपचार व्हावा यासाठी खाजगी रुग्णालयाच्या नोंदीचे लक्षांक वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे तालुकास्तरावर किती रुग्णालये नोंदणीकृत झाली आहेत,

(३) तसेच, कृत्रिम सांधा रोपणाची शास्त्रक्रिया ही शासकीय रुग्णालयात करण्यात येत असून या शस्त्रक्रियेसाठी शस्त्रक्रिया विभाग आधुनिक उपकरणांनी सुसज्ज नसल्यास त्याठिकाणी खाजगी रुग्णालयाला शस्त्रक्रियेस परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आजपर्यंत एकूण ४९२ (८२ शासकीय व ४१० खाजगी) रुग्णालये अंगीकृत असून नवीन ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून ऑडीट प्रक्रिया सुरू आहे.
(३) प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांना सांधे प्रत्यारोपणाच्या १० उपचारांचा लाभ देण्यात येत आहे. कृत्रिम सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शासकीय रुग्णालयासाठी राखीव ठेवण्यात आली असून निकषाची पूर्तता करणाऱ्या शासकीय रुग्णालयानांच या शस्त्रक्रियेसाठी परवानगी देण्यात येत आहे.

सुधारीत एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांसह महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांना सांधे प्रत्यारोपणाच्या उपचारांचा लाभ देण्यात येणार आहे. याबाबत योजनेच्या निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रशासकीय बाबी पूर्ण करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत

**(५६) * ६९२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४६८८० ला दिनांक १७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी (जि.परभणी) येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्यावतीने सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा पातळीवर जेथे जिल्हा रूग्णालय आहे तेथे वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याबाबतचे धोरण राज्य व केंद्र शासनाने स्वीकारले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धोरणाप्रमाणे परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय व त्याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा पातळीवर जेथे जिल्हा रुग्णालय आहे तेथे वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याबाबत केंद्र शासनाचे धोरण आहे.
(३) नाही.

तथापि, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत नियुक्त तज्ञ समितीद्वारे परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापनेच्या अनुषंगाने तपासणी करुन प्राथमिक अहवाल सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हुमन प्रकल्पाच्या (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) कामाला सुरुवात करण्याबाबत

**(५७) * २६२ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ४७०२३ ला दिनांक १७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हुमन नदी (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) येथे हुमन प्रकल्पाला सन १९८३ मध्ये शासनाने मान्यता देवून ३६ वर्षाचा कालावधी उलटूनही सदर प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली नसल्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाला वन व पर्यावरण विभागाने मान्यता देवून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महसूल विभागाने वन विभागाला वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यात पर्यायी जमीन उपलब्ध करून देवूनही दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी नऊ सदस्यांची समिती स्थापन केली असून सदर समितीची एकही बैठक घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास जंगलातील प्राण्यांना, चंद्रपूर जिल्ह्यातील मूल, पोंभूर्णा व चंद्रपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना फायदा होवून ४६ हजार हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील** : (१) सन १९८२-१९८३ ते १९८४-१९८५ या कालावधीत उपधरण, पोचमार्ग व इमारती इ. प्राथमिक स्वरुपाची कामे करण्यात आली. वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत वन जमिनीची अंतिम मान्यता नसल्याने सन १९८४-१९८५ पासून काम बंद आहे.
(२) हे खरे नाही.

दिनांक ०१/१२/२०१६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीची बैठक प्रधान सचिव (वने) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०५/०३/२०१९ व दिनांक १३/०१/२०२० रोजी संपन्न झाली असून दिनांक २४/०१/२०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झालेली आहे.
(३) होय.
(४) मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/०१/२०२० रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रकल्पाचे सद्याचे प्रस्तावित स्थळाचे वरचे भागात १.० ते ५.० कि.मी. पर्यंतचे पर्यायी स्थळांचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याच्या दिलेल्या सुचनांनुसार क्षेत्रियस्तरावर अभ्यास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५८) * १२८२ श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सकांसह शस्त्रक्रिया, स्त्रीरोग, प्रसुती तज्ञ व बालरोग तज्ञ आदींनी नोकरीचा राजीनामा दिल्यामुळे सदर पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा रुग्णालयातील वर्ग-१ ची १९ मंजूर पदापैकी केवळ जिल्हा शल्यचिकित्सक, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाहयसंपर्क) आणि कान-नाक-घसा सर्जन या ३ पदावर डॉक्टर कार्यरत असून उर्वरित १६ पदे रिक्त आहेत, तसेच वर्ग-२ ची ३० पदे मंजूर असून त्यापैकी १८ पदे भरलेली आहेत व उर्वरित १२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्हा रुग्णालयात वर्ग-१ व वर्ग-२ तसेच अन्य वैद्यकीय अधिकारी व इतर संवर्गातील रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, जिल्हा रुग्णालयात औषधोपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना योग्य व चांगली आरोग्य सेवा मिळावी म्हणून रुग्णालयातील सर्व रिक्त पदे भरण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत एकूण ०८ विशेषज्ञांच्या सेवा जिल्हा रूग्णालयास उपलब्ध आहेत.

तसेच, गट-अ (एस-२० वेतन स्तर : ५६१००-१७७५००) मधील वैद्यकीय अधिकारी यांच्या १२ रिक्त पदांवर कंत्राटी स्वरूपात ०६ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

(३) व (४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (एस-२३ वेतन स्तर : ६७७००-२०८७००) मधील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (एस-२० वेतन स्तर : ५६१००-१७७५००) मधील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिलांच्या सुरक्षेकरीता कार्यान्वित केलेल्या "वन स्टॉप सेंटर" योजनेची दुरवस्था झाल्याबाबत

**(५९) * १७६३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.प्रसाद लाड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांच्या सुरक्षा व अत्याचार पिडितांना मदतीसाठी कार्यान्वित केलेल्या केंद्र शासनाच्या "वन स्टॉप सेंटर" योजनेची दुरवस्था झाली असल्याचे राज्य महिला आयोगाने मा.मुख्यमंत्री व मा.महिला व बालविकास मंत्री यांना सादर केलेल्या अहवालातून स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य महिला आयोगाच्या मुख्य शिफारशींचा गोषवारा काय आहे व अहवालातील शिफारशींबाबत शासनाने कोणते निर्णय घेतले आहेत,

(३) असल्यास, सदर केंद्रांवर कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यात प्रशिक्षणाचा अभाव, निधीचे वितरण वेळेवर न होणे, काही केंद्र अयोग्य ठिकाणी असून त्यामध्ये अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे एकही केंद्र कार्यान्वित नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पिडीत महिलांच्या पुनर्वसनासाठी स्थापन केलेल्या ह्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करून कार्यान्वित केंद्रांवर अद्यावत सोयी सुविधा पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) नाही, हे खरे नाही.

राज्य महिला आयोगाने सादर केलेल्या अहवालामध्ये वन स्टॉप सेंटर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने शिफारशी केल्या आहेत.
(२) राज्य महिला आयोगाने केलेल्या सूचना शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत. :-

१. वित्तीय बाबीसंदर्भात.
२. अंमलबजावणी संस्था नियुक्त करणे.
३. पायाभुत सुविधा व बांधकामाबाबत.
४. नियंत्रण, पर्यवेक्षण यंत्रणा तसेच १८१ हेल्पलाईन सुविधा बळकट करणे.

तथापि, सदर अहवाल शासनाने अद्याप स्विकृत केलेला नाही.
(३) व (४) केंद्र शासनाच्या निकषानुसार राज्यातील ३६ जिल्हयासाठी ३७ केंद्रे मंजूर करण्यात आली असून सर्व केंद्रे सध्या कार्यरत आहेत. आयुक्तालयाचे दिनांक २०/११/२०१९ पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना वन स्टॉप सेंटर योजनेचा जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणेबाबत कळविलेले आहे.

केंद्र पुरस्कृत वन स्टॉप सेंटर या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यातील सर्व ३६ जिल्हयांमध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच १८ जिल्हयांमध्ये ईम्प्लीमेंटीग एजन्सी नियुक्तीबाबतची कार्यवाही सुरु आहे. वन स्टॉप सेंटरच्या इमारतीच्या कायमस्वरुपी बांधकामासाठी २४ जिल्हयांमध्ये शासकीय जमीन उपलब्ध झाली असून उर्वरित जिल्हयांमध्ये शासकीय जमीन उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरोग्य सेवेच्या सह संचालकांनी आहार सेवेची निविदा नियमबाह्यरीत्या राबविल्याबाबत

**(६०) * १८०७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य सेवेच्या सह संचालकांनी आहार सेवेची निविदा नियमबाह्यरित्या राबविल्यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयाचे नुकसान झाले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आहार सेवेचे काम प्रति रुग्ण रुपये ७४/- या अल्पदरात योग्यरित्या सुरु असतानाही सह संचालकांनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता वाढीव दराने म्हणजेच प्रतिरुग्ण जीएसटीसह रुपये १२६/- प्रमाणे नियमबाह्य आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील अनेक संस्थांनी अनावश्यक कागदपत्रे सादर करण्याची मागणी करुन निविदा अपात्र ठरविली असून याप्रकरणी कार्यारंभ आदेश देताना शासनाची प्रशासकीय आणि वित्त विभागाची मान्यता घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासकीय मान्यता व कार्यादेशात प्रतिरुग्ण प्रतिक्षेत्र तफावत असल्याने शासनाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेण्यास योग्य मार्गदर्शन करण्याबाबत भंडारा येथील शल्यचिकित्सकांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील आरोग्य सेवेच्या सह संचालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील सार्वजनिक विभागाच्या अखत्यारीत एकूण ४९५ रुग्णालयामध्ये आहार सेवा पुरविण्यासाठी शासन निर्णय, दिनांक ०३/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांच्यास्तरावर ई-निविदा प्रक्रिया राबवून एकूण ५ सेवा पुरवठा दारास राज्यातील जिल्ह्याची विभागणी करुन दिनांक ०७/०३/२०१९ च्या पत्रान्वये पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयाच्या कार्डिओलॉजी विभागात स्टेन्टसाठी अवास्तव दर आकारणी करीत असल्याबाबत

**(६१) * २९९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हृदयविकारावरील उपचारासाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेन्टच्या किंमती शासनाने निर्धारित केल्या असतानाही मुंबईतील जे.जे. रुग्णालयाच्या कार्डिओलॉजी विभागात स्टेन्टसाठी अवास्तव दर आकारणी करुन रुग्णांची लुट करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेंतर्गत येणाऱ्या रुग्णांनाही खाजगी कंपन्यांकडून स्टेन्ट विकत घ्यावा लागत असल्याने अतिरिक्त स्टेन्टमुळे भुर्दंड पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत दोन वर्षापासून दोनपेक्षा अधिक स्टेन्ट लागत असलेल्या अनेक रुग्णांकडून तिसऱ्या व चौथ्या स्टेन्टसाठी अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्टेन्टसाठी अतिरिक्त पैसे घेणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत ई-अंगणवाडी किट निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६२) * ४८८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नागपूर येथील एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत सन २०१८-१९ या वर्षात ई-अंगणवाडी किट निविदा प्रक्रियेत टेक्नोक्राफ्ट असोसिएशन कंपनीने आर्थिक तीन वर्षाचे चुकीचे प्रोव्हिजन लेखापरिक्षण ताळेबंद माहिती सादर करून कंत्राट मिळविल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चुकीचे लेखापरिक्षण अहवाल सादर करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

(२) स्मार्ट अंगणवाडी किटसाठी प्रकाशित ई-निविदेंतर्गत मे.टेक्नोक्राफ्ट असोसिएशन हे L१ निविदाधारक असल्याने त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. सदर निविदाधारकांच्या दस्ताऐवजांची तपासणी माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये करण्यात आलेली असून कंपन्यांचे लेखापरिक्षण करणेसाठी ३१ ऑक्टोंबर, २०१९ पर्यंत मुदत असल्याने सदर L१ निविदाधारकांने प्रोव्हीजनल टर्न ओव्हर प्रमाणपत्र हे सनदी लेखापाल (CA) यांच्या स्वाक्षरीने सादर केलेले असल्याने त्या आधारावर सदर निविदाधारकास तांत्रिकदृष्टया पात्र ठरविण्यात आलले होते.

तथापि, सदर कंपनीच्या अंतिम लेखा परिक्षणाअंती त्यांची सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील आर्थिक उलाढाल कमी झालेली असल्याचे निदर्शनास आल्याने सदरची निविदा रद्द करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित पुरवठाधारकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. नोटीसीचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर संबंधित पुरवठाधारकावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील तापी नदीच्या खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी गुजरात राज्याला मिळत असल्याबाबत

**(६३) * २६९ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात तापी नदीच्या खोऱ्यांतून दरवर्षी सुमारे ७२५० दशलक्ष घनमीटर पाण्याचा प्रवाह वाहत असून तापी खोऱ्यात सुमारे ४०० टीएमसी पाणी उपलब्ध असून सन १९६२ मध्ये अय्यंगार समितीने या नदीच्या पाण्याचे वाटप केलेले असून त्यानुसार गुजरात राज्याला १४६ टीएमसी, महाराष्ट्राला १९१ टीएमसी आणि मध्य प्रदेशला ७० टीएमसी पाणी देण्याचे निश्चित झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात एकटे गुजरात राज्य तापी खोऱ्याचे सुमारे २५० टीएमसी पाणी वापरत असून पाणी वाटपाच्या सूत्रानुसार १९१ टीएमसीपैकी महाराष्ट्र ९० टीएमसी पाणी वापरत असून उर्वरित पाणी गुजरातला मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अय्यंगार समितीने केलेल्या वाटपानुसार तापी खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाटयाचे पाणी महाराष्ट्रात पूर्णपणे वापरले न जाण्याची व उर्वरित पाणी गुजरातला मोफत मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने महाराष्ट्राच्या वाटयाचे पाणी महाराष्ट्रातच उपलब्ध व्हावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

(२) नाही.

उकाई तांत्रिक समितीने (अय्यंगार समिती) जानेवारी, १९५८ मध्ये तापी खोऱ्यातील उपलब्ध पाण्याच्या वाटपाबाबत अभ्यास केला आहे. त्या नुसार ७५% विश्वासार्हतेनुसार ४०० अघफु पाणी तापी खोऱ्यात उपलब्ध आहे. त्या पाण्याचे वाटप हे गुजरात राज्यास १३८.६० अघफु, महाराष्ट्र राज्यास १९१.४० अघफु व उर्वरीत ७० अघफु मध्यप्रदेश राज्यास याप्रमाणे देण्याचे शिफारस करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रातील तापी नदी खोऱ्यात जलसंपदा विभागाचे ४२० प्रकल्प पूर्ण झाले असून त्यात ३३७६.११५ दलघमी (११९.२१ अ.घ.फु.) पाणीसाठा झालेला असून त्याचा वापर सुरू आहे व ७० प्रकल्पात ११३१.५१८ दलघमी (३९.९५ अ.घ.फु.) पाणीसाठा निर्माण झालेला असून त्या प्रकल्पांची वितरण प्रणालीची कामे प्रगतीत आहेत. एकूण (३३७६.११५ + ११३१.५१८ = ४५०७.६३३ दलघमी) १५९.१६ अ.घ.फु. पाणीसाठा निर्मिती झालेला असून उर्वरीत ६१ प्रकल्पांचा पाणीसाठा निर्मिती व वितरण प्रणालीची कामे प्रगतीत आहेत. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या हिश्याचे १९१.४० अ.घ.फु. पाण्याचा पूर्ण वापराचे नियोजन करण्यात आले आहेत.

एकात्मिक राज्य जल आराखड्यातील तापी खोऱ्यामधील नमूद केलेल्या प्रकल्पांच्या पाणीसाठा निर्मितीचे काम प्रगतीत असल्याने व मध्यप्रदेशच्या हिश्याचे ७० अ.घ.फु. पाणी वापराचे नियोजन मध्य प्रदेश सरकार कडून झालेले नसल्याने सदर पाणी खाली वाहून येत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या हिश्याचे पाणी गुजरातला मोफत मिळत आहे ही बाब खरी नाही.

(३) एकात्मिक राज्य जल आराखड्यातील तापी खोऱ्यामधील पाणीसाठा व वितरण कामे प्रगतीत असलेल्या ६१ प्रकल्पांतर्गत २५६८ द.ल.घ.मी. (९० अ.घ.फु) पाण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत काही प्रकल्प बांधकामाधीन असून ९० अ.घ.फु पाण्यापैकी भविष्यकालीन योजनांकरीता ही नियोजन करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्राच्या हिश्याचे संपूर्ण पाणी अडविले जाईल.
(४) तापी खोऱ्यामध्ये उपलब्ध असलेल्या महाराष्ट्राच्या वाटयाच्या पाण्याचे नियोजन करणेत आले आहे. त्या अनुषंगाने बांधकामाधीन तसेच भविष्यकालीन प्रकल्पांसाठी राज्याच्या आर्थोपायी परिस्थितीनुसार उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार पाणी अडविणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) उपरोक्त नुसार कार्यवाही प्रगतीत आहे. तथापि, नियोजनानुसार प्रकल्पांसाठी निधी उपलब्धता, भुसंपादनातील अडचणी, वन जमीन उपलब्धता इ. मुळे प्रकल्प पूर्ण होणेस विलंब होत आहे.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(६४) * १८३५ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया, गोरेगाव, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, सडक अर्जुनी, आमगाव, सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यामध्ये डॉक्टरची डिग्री नसतानाही बोगस डॉक्टर ग्रामीण भागात कार्यरत असून रुग्णांना जास्त पॉवरच्या गोळ्या (पेनकिलर) दिल्याने अनेकांना किडनीचे आजार होऊन मृत्यू झाल्याच्या घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयामध्ये अनेक ठिकाणी बोगस डिग्रीच्या माध्यमातून अनधिकृत व्यवसाय करीत असणाऱ्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) गोंदिया जिल्ह्यामध्ये डॉक्टरची डिग्री नसतानाही बोगस डॉक्टर ग्रामीण भागात डॉक्टर म्हणून कार्यरत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तथापि, रूग्णांना जास्त पावरच्या गोळया (पेनकिलर) दिल्याने अनेकांना किडनीचे आजार होऊन मृत्यू झाल्याच्या घटना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे. याबाबत दिनांक ०७/०१/२०२० अन्वये मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य यांना उद्देशुन केलेली बोगस डॉक्टर बाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) याबाबत चौकशी करण्याच्या सूचना संबंधित तालुका वैद्यकिय अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील झरी-जामडी (जि.यवतमाळ) तालुक्यातील कुमारी मातांबाबत

**(६५) * ५४ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.निलय नाईक, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील झरी-जामडी तालुक्यात (जि.यवतमाळ) १०० पेक्षा अधिक कुमारी माता असल्याचे दिनांक १८ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्याच्या दुर्गम भागात शिक्षणाचा अभाव, गरीबी आणि कायद्याचे अज्ञान या कारणामुळे त्या भागातील अल्पवयीन मुली व अविवाहित महिलांवर मातृत्व लादण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कुमारी मातांना शासनामार्फत महिन्याला रुपये ४२५/- आर्थिक सहाय्य करण्यात येत असून त्यामध्ये रुपये १०००/- पर्यंत वाढ करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कुमारी मातांच्या पुनर्वसनासाठी मोरेगाव तालुक्यात पुनर्वसन केंद्र सुरु करण्याचे व त्याकरीता मौजे सावरखेडा येथे पाच एकर जमीन देण्यात येवून १४ कोटीचा निधी उपलब्ध न झाल्यामुळे सदर पुनर्वसन केंद्राचे काम सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कुमारी मातांना देण्यात येणाऱ्या मानधनाच्या रक्कमेत वाढ न करण्याची व त्यांचेसाठी मौ.सावरगाव (ता.मोरेगाव) येथे सुरु करावयाच्या पुनर्वसन केंद्राचे काम सुरु न करण्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) नाही, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणानुसार झरी-जामडी तालुक्यात सद्य:स्थितीत ३० कुमारी माता आहेत.
(२) अंशत: खरे आहे.
(३) नाही, अशी मागणी शासनास अद्याप प्राप्त झाली नाही.
(४) व (५) होय, कुमारी मातांच्या पुनर्वसनासाठी मोरेगाव तालुक्यातील मौजा टाकरखेडा येथे गट क्र.३४ मधील ५ एकर ई-क्लास जमीन मिळालेली असून या जागेवर बांधकामाचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) ग्रामीण रुग्णालयात रिक्त पदे भरण्याबाबत

**(६६) * १३२५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर (जि.ठाणे) ग्रामीण रुग्णालयात प्रतिदिन २५० ते ३०० बाह्यरुग्ण व ५ ते १० आंतररुग्ण तसेच लसीकरण या सेवेसाठी येत असूनही अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे रुग्णांना उपचाराअभावी परत जावे लागत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयातील आवश्यकती रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडे मागणी व पाठपुरावा करूनही त्याची पूर्तता झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बदलापूर ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बदलापूर (जि.ठाणे) ग्रामीण रुग्णालयातील एकूण २५ मंजूर पदांपैकी १८ पदे भरलेली असून ०७ पदे रिक्त आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ग अ | ०४ | ०३ | ०१ |
| २ | वर्ग ब | ०० | ०० | ०० |
| ३ | वर्ग क | १४ | ११ | ०३ |
| ४ | वर्ग ड | ०७ | ०४ | ०३ |
| | एकूण | २५ | १८ | ०७ |

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून रुग्णांवर योग्य ते उपचार करण्यात येत असून रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

गट अ ची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू असून गट क व ड ची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास निधी मिळणेबाबत

**(६७) * १४९ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची (घाटी) इमारत बांधकाम, रस्ते, कंपाऊंड वॉल जुने झाले असून इमारत जीर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात दररोज २५०० रुग्णांची बाहय रुग्ण तपासणी होत असल्याने औषधी/सर्जिकल साहित्य कमी प्रमाणात असल्याने अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयात आवश्यक त्या प्रमाणात औषधी/सर्जिकल साहित्य खरेदीसाठी व यंत्र सामुग्री दुरुस्तीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे निधीची मागणी केली असली तरी निधी मिळत नसल्याने रुग्णाला सेवा देण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने इमारत बांधकाम, रस्ते, कंपाऊंड वॉल दुरुस्ती, औषधी/सर्जिकल साहित्य खरेदीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) औषधे व सामुग्री, यंत्रसामुग्री दुरूस्ती व परिरक्षणासाठी पुरवणी मागणीद्वारे निधीची मागणी करण्यात आलेली आहे.

(४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील रस्ते बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर काम प्रगतीत आहे. कंपाऊंड वॉल दुरुस्ती प्रस्ताव विचाराधीन आहे. तातडीच्या प्रसंगी स्विय प्रपंची खात्यातून औषधे/सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलसंधारण विभागाने धरणांना दिलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६८) * १०११ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलसंधारण विभागाने काही धरणांना दिलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याने अशा सगळ्या निर्णयांना शासनाने स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित विभागातील प्रशासकीय मान्यतामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पातूर (जि.अकोला) पंचायत समितीमध्ये कृषी अधिकारी हे दहा वर्ष एकाच ठिकाणी कार्यरत असल्याबाबत

**(६९) * १५८० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर (जि.अकोला) पंचायत समितीमध्ये कृषी अधिकारी वर्ग-२ चे अधिकारी श्री.विनोद शिंदे हे दहा वर्ष एकाच ठिकाणी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयानुसार वर्ग-२ चे अधिकारी हे एकाच तालुक्यात ३ वर्ष कार्यरत राहू शकतात असे असतानाही श्री.विनोद शिंदे हे १० वर्ष एकाच ठिकाणी कार्यरत राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सदर अधिकाऱ्याविरोधात अनेक तक्रारी आल्या असतानाही तक्रारीची दखल घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) नाही.
(२) संबंधित कृषी अधिकारी, पंचायत समिती, पातूर येथे कृषी अधिकारी या पदावर कार्यरत असून त्यांना पंचायत समिती, पातूर येथे ८ वर्षे ८ महिने पूर्ण झालेले आहेत.

ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/-१४, दिनांक १५/०५/२०१४ अन्वये प्रशासकीय बदलीसाठी १० वर्षे वास्तव्याचा कालावधी एकाच मुख्यालयी पूर्ण असणे आवश्यक आहे. त्यांचा १० वर्षाचा कालावधी पूर्ण झाला नसल्यामुळे त्यांचे प्रशासकीय स्थानांतरण करण्यात आलेले नाही.
(३) नाही.
(४) संबंधित कृषी अधिकाऱ्याच्या विरोधात केलेली तक्रार तक्रारदाराने मागे घेतली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) किल्ल्यावरील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत

**(७०) * १६१८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) किल्ल्यावर अनधिकृत बांधकामे झाली असून सदरहू बांधकामांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसई किल्ल्यावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) हे खरे नाही.

वसई किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. या किल्ल्यावर अनधिकृत बांधकाम झाल्याचे लक्षात येताच "प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९५८" मधील तरतूदीनुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांच्यामार्फत कार्यवाही केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामाबाबत

**(७१) * ९०७ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील कामांना कार्यारंभ आदेश न देण्याचे आदेश शासनाकडून काढण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या आदेशामुळे जिल्हातील ७६१ कामे रद्द करण्यात आल्याचे वा करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगांव जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत ७६१ कामांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) जळगाव जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ मध्ये निवडण्यात आलेल्या गावातील कामांसाठी रुपये ६२.७८ कोटी विशेष निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामे प्रलंबित असल्याबाबत

**(७२) * ६९३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील बहुतांशी कामे अधिकारी, कंत्राटदार यांच्यातील हितसंबंधामुळे पूर्ण होऊ शकली नसल्याने प्रलंबित असलेल्या सर्व कामांची चौकशी करून दोषींविरूध्द कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विहित मुदतीत कामे पूर्ण न करणारे कंत्राटदार व संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) लेखी निवेदन दिल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **श्री.राजेंद्र भागवत**
**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.